# दिनांक २०/०७/२०१० रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत .

| अक्र / विषय क्र. | विषय | विषय सादर करणारी संघटना कार्यालय | कार्यवाहीशी संबंधीत कार्यालय | कार्यवाही / निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे | जि.उ.कें.अ.नगर | - | सदस्य सचिवांनी मा. अध्यक्षांचे वतीने उपस्थित सर्व सदस्यांचे हार्दीक स्वागत केले. मागील सभेचे इतिवृत्त सर्व सदस्यांना पाठविण्यात आलेले असून त्या बाबत कोणाचे काहीही म्हणणे नसल्याने त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| २ | मे.सनफार्माजवळ वाहने उभि असलेमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर अहमदनगर | महा नगरपालिका, अहमदनगर | रिक्षांसाठी थांबा असा फलक लावलेला असुनही ट्रकस उभे असतात. असे चेंबरने सांगीतले असता मा. अध्यक्षांनी मऔविमं यांनी केवळ पोलीस खात्यास पत्रे लिहुन चालणार नाही तर स्वतः खात्यास भेट देऊन त्यावर पुढे सतत पाठपुरावा करीत रहावा असे सूचित केले. तसेच उपस्थित पोलीस खात्याचे सदस्यांना त्वरीत बंदोबस्ताची कार्यवाही करण्याचे सुचित केले. **(कार्यःमऔविमं, पोलीस खाते.)** |
| ३ | महा.नॉनबायोडिग्रेडिबल गार्बेज नियंत्रण अध्यादेश २००६ व त्याअंतर्गत महा. प्लार्स्टी कपिशव्यांचे (कॅरीबॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम २००६ व महा. अविघटनशिल धनकचरा नियम २००६ बाबत | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर | मऔविम | मऔविमं ने प्लॉट नं. २५ ओपन स्पेस मधील जागेत व्यवस्था केली आहे परंतु ना हरकत दाखला प्रदुषण मंडळाने दिलेला नाही. त्यावर मा. अध्यक्षांनी आदेश दिले की, प्रदुषण मंडळाने ३१-७-१० पर्यत कार्यवाही करावी व औद्यो. संघटनेने तसे सर्वासाठी परिपत्रक काढुन अध्यक्षांना अहवाल सादर करावा. **(कार्य : मऔविमं आणि मप्रनिमं)** |
| ४ | श्रीरामपूर मऔविमं क्षेत्रासाठी मोठया प्रमाणावर कायम स्वरुपी पाणी पुरवठयाची सोय होणे बाबत. | श्रीरामपूर एम आय डी सी असोशिएशन | मऔविमं | सदरचे काम प्रगतीपथावर असून असोशिएशन यांनी समाधान व्यक्त केले. मऔविमं ने नोव्हेंबर २०१० पर्यत काम पूर्ण होईल असे स्पष्ट केले. सर्वानुमते विषय, विषय सूचिवरुन कमी होणेस सहमती दिली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | मऔविमं क्षेत्रासाठी अतिरिक्त जमीन संपादन | मराठा चेंबर | मऔविमं | जिउकें ने पत्र दि. २९-३-१० अन्वये कार्यवाही करण्याची विनंती केली होती. त्यावर मंडळाचे क्षेत्र व्यवस्थापक यांनी पत्र दि. १४-७-२०१० अन्वये कळविले की, सदरचे मुद्यांबाबत मा.अध्यक्षांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे संबंधीत तालुक्याचे मान्यवर आमदारांना सर्व नियोजित भूसंपादनाचे जागेत शासकीय / खाजगी जमीनीचे किती एकर क्षेत्र आहे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेची तजविज ठेवली आहे. मा. अध्यक्षांनी खंत व्यक्त केली की मऔविमं कार्यालयाकडुन पाठपुराव्याचा पत्रव्यवहार केला जात नाही. मा. अध्यक्षांनी त्यांच्या स्वाक्षरीचे अर्ध शासकीय पत्र मंडळाच्या मुख्य कार्याकारी अधिकारी व विकास आयुक्त (उद्योग) यांना पाठविण्यासाठी मसुदा सादर करण्याच्या सूचना सदस्य सचिवांना दिल्या. **(कार्यवाही :-जिउके व मऔविव )** |
| ५ | कामगारांना वाहुन नेणा-या मिनी डोअर वाहनासाठी विनंती थांब्यांची जागा निश्चित होणे. | मराठा चेंबर | मनपा | जिउकें ने पत्र दि. २९-३-१० अन्वये मनपा यांना कार्यवाही करण्याची विनंती केली होती. परंतु अद्याप माहिती अप्राप्त आहे. चर्चे अंती मनपा चे आयुक्त यांच्या समवेत बैठक घेऊन जागा लवकर निश्चित करण्याचे कळविण्यास सांगीतले. (कार्यवाही :- जिउके / मनपा) |
| ६ | कोपरगांव सऔव नविन जागा मिळणे बाबत. | सऔव कोपरगांव | महसूल विभाग | वसाहतीने मागणी केलेली जागा पशु संवर्धन विभागाची आहे. पशु संवर्धन विभागाने जागा वसाहतीस देऊ नये असे कळविल्यामुळे वसाहतीने पर्यांयी जागा शोधावी असे मा. जिल्हाधिकारी यांनी सूचित केले. तसेच त्यांनी स्वतः जागेची पहाणी करण्याचा मनोदय व्यक्त केला. (कार्यवाही :- मऔविमं ) |
| ७ | जिल्हा उद्योग केंद्र येथे सेतू कार्यान्वित करणे बाबत | म.व्य. जि.उ.कें. अ.नगर | - | जिउकें ची इमारत पावसाळयात गळते त्यामुळे संगणक, प्रिंटर, फर्निचर वगैरे चिज वस्तुंचे नुकसान होईल म्हणुन प्रथम इमारत दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकासह दि. २५-९-०९ रोजी शासनाकडे रु.९.७२ लक्ष खर्चाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. प्रस्तावास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | लवकर मान्यता मिळणेसाठी ना. पालकमंत्री यांनीसुध्दा पत्रव्यवहार केलेला आहे. १५ ऑगष्ट अखेर इमारत दुरुस्ती न झाल्यास अथवा प्र्शासकीय मान्यता न मिळाल्यास जिल्हा नियोजनाच्या तरतूदीतुन खर्चा बाबत सदस्य सचिवांनी जिल्हा नियोजन विभागाशी संपर्क साधावा अशा सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. ( **कार्यवाही : जि.उ.के.**) |
| ८ | श्रीरामपूर न.पा.कडुन सऔव यांना मुलभूत सुविधा पुरविल्या जात नाहीत | श्रीरामपूर न.पा.कडुन सऔव | न.पा.श्रीरामपूर | वसाहतीने दि. ३-३-१० अन्वये कळविले की, मंजूर ले-आउट मधील अंतर्गत रस्त्यावर कोठेही युनिटधारकांचे अतिक्रमण नाही. असल्यास न.पा.केने लेखी कळवावे तसेच ज्या रस्त्याचे काम करावयाचे ते सर्व मोकळे आहेत. उद्योजकांकडून न.पा.स विविध कराचे वर्षाला ५ ते ६ लक्ष रु. भरणा करतात. अद्याप काम पूर्ण झालेले नाही. न.पा.कडून अहवाल अप्राप्त.मा. अध्यक्षांनी पुढील आठवडयात स्वतः पहाणी करण्याचे स्पष्ट केले. (**कार्यवाही:-न.पा.,श्रीरामपुर / सऔव**) |
| ९ | अ.नगर मऔविमं मध्ये पाण्याचे दर व सेवादर आकारणी ही डी-झोन प्रमाणे करणे बाबत | मे. प्रशंशा इंडस्ट्रीज | मऔविमं | जिउकें ने पत्र दि. २९-३-१० अन्वये कार्यवाही करण्याची विनंती केली होती. त्यानुसार मऔविमं यांनी पत्र दि. ७-४-२०१० नुसार कार्यकारी अभियंता,पूणे यांचेकडुन स्मरणपत्राने मार्गदर्शन मागविले आहे. औद्यो. संघटनांनी स्पष्ट केले की मऔविमं ने मऔविमं क्षेत्रास डी-झोन झाल्याचे जाहीर केले असल्यामुळे पाणी पुरवठयाचे दर सुध्दा डी-झोन प्र्माणे आकारणी करावी. मा. अध्यक्षांनी यावर मंडळाचे मु.का.अ. यांना त्यांच्या स्वाक्षरीने अर्ध शासकीय पत्राव्दारे ही बाब कळविण्यास सांगीतले. तसेच मा. पालक मंत्री महोदयां सोबत एक बैठक आयोजित करण्यात यावी. (**कार्यवाही :- जिउके व उप अभियंता (देखभाल व दुरुस्ती) मऔविम)** |
| १० | कोपरगांव सहकारी औद्योगिक वसाहतीच्या पब्लीक ॲमेनिटीच्या जागेत व ओपन स्पेसच्या जागेत असलेल्या डी पी योग्य ठिकाणी शिफटींग करणे बाबत. | कोपरगांव औद्योगिक वसाहत कोपरगांव | म रा वि वि कं | वसाहतीने स्पष्ट केले की मराविमं च्या मदतीने डी पी स्वखर्चाने हलविण्यात आलेली आहे. पुर्तता झालेली असल्याने विषय सचिवरुन कमी करण्याचे सर्वानुमते ठरले. ( कार्यवाही :- अभियंता मराविविकं) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | कोपरगांव सऔव च्या क्षेत्रात रात्रीच्या वेळेस पोलीस गाडीचा राऊंड होणेबाबत. | कोपरगांव औद्योगिक वसाहत कोपरगांव | पोलीस अधिक्षक अहमदनगर | याबाबत पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय अहमदनगर यांनी पत्र दि. २१-१-१० अन्वये कोपरगांव पोलीस ठाणे येथील प्रभारी पोलीस निरीक्षक यांना पत्र पाठवून वसाहतीच्या परिसरात दिवसा व रात्री पोलीसांची गस्त ठेवण्याबाबत विनंती केली आहे. वसाहतीमध्ये नेमलेल्या पोलीस अंमलदार, बीट मार्शल व रात्रपाळी ग्रस्तीची वाहने ही ठेवण्यात येणा-या हजेरी पत्रकावर स्वाक्ष-या करतील व गुन्हयांची नोंद करण्याची अश्या प्रकारच्या सुचना नमूद केलेल्या आहेत. सदर विषयाची पूर्तता झालेली असल्याने विषय सूचिवरुन कमी होणेस हरकत नसावी. |
| नविन | विषय | | | |
| १ | १. खंडाळा (श्रीरामपूर) मऔविमं क्षेत्रातील कारखान्यातील दुषित पाण्या बाबत,<br>२. वी.के.डिस्टीलरीज प्रा.जि. या कंट्रीलिकर कारखान्याचे ग्रीन झोनमधुन जागा शिल्लक असलेल्या औद्यो.झोन मध्ये कायमस्वरुपी स्थलांतर करणे बाबत. | १. ग्राम पंचायत, रांजणखोंल, ता. राहाता.<br>२. श्रीरामपूर एमआयडीसी इंड.असो. श्रीरामपूरं | मऔविमं | जिउकें ने पत्र दि. ४ जुन २०१० अन्वये मऔविमं यांना सद्यस्थितीचा अहवाल पाठविण्यास कळविले होते. त्यानुसार मऔविमं यांनी घटकांस सुरु असलेले बांधकाम तात्काळ थांबविण्याचे कळविले आहे. औद्यो.संघटनेचे प्तिनिधीने स्पष्ट केले की, घटकाने झाडे काढली , मैलापाईप लाईन फोडुन गैर वापर करीत आहे. मऔविमं ने ठरवून दिलेल्या ग्ीनझोन व कमर्शियल झोन मध्ये बदल होऊ नये. रांजणखोल व खंडाळा गाम पंचायतीने जागा दिलेली आहे. त्या क्षेत्रातील लोकांना धोका निर्माण झाला आहे. पिण्याचे पाण्याचा नमुना तपासणी करीता दिला असता ते पाणी पिण्यास लायक नसल्याचे निष्पन्न झाले आहे. चर्चे अंती मा. अध्यक्षांनी उपविभागीय दंडाधिकारी,श्रीरामपूर यांच्या अध्यक्षतेखाली प्दुषण नियंत्रण मंडळ, मऔविमं, श्रीरामपुर मऔविमं संघटना, जिउकें यांनी समिती गठित करुन, प्त्यक्ष पहाणीचा अहवाल एक आठवडयात सादर करण्याच्या सूचना पदूषण मंडळास दिल्या. **(कार्य : पदुषण नियंत्रण मंउळ)** |
| २ | १. भाळवणी औद्यो. क्षेत्रातील वीज पुरवठा खंडीत होणे<br>२. संगमनेर सऔव मधील घटकांना | अस्मिता, अ.नगर | मराविविकं. मर्या. | जिउकें ने मराविमं यांना अडचणी कळवुन अभिप्राय पाठविण्याची विनंती पत्र दि. १४-६-१० अन्वये केली होती. अद्याप केलेल्या कार्यवाहीची माहिती अप्राप्त आहे. त्यावर मा. अध्यक्षांनी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वीज पुरवठा कमी दाबाने होणे बाबत | संगमनेर सऔव | | त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या (**कार्य : मराविमं**) |
| | १. | | | |
| ३ | १. मऔविमं चे प्रादेशिक कार्यालय पुर्वीप्रमाणे अ.नगर येथे सुरु करावे.<br><br>२. घोडेगांव मऔविमं ची सद्यस्थितीतील प्रगतीची माहिती उपलब्ध होणे<br><br>३. मऔविमं क्षेत्रातील वृक्षतोड होत आहे,<br><br>४. ग्रा.पं. कर - मऔविमं क्षेत्रात ३ ग्रा. पं. आहेत. ग्रा पं कडुन घटकांना ग्रा पं करांसाठी पत्रे पाठविली जातात. कारखानदारानां क्ष्यांचा कारखाना कोणत्या ग्रा.पं.हद्दीत येतात याची माहिती नाही ती उद्योजकांना व्हावी.<br><br>५. मऔविमंच्या चौका चौकात कंपन्या विविध आकाराचे आपल्या नांवाचे खाजगी फलक लावत आहेत त्यामुळे फलकांची गर्दी वैंढत आहे व मऔविमं ची संदरता खराब होत | मराठा चेंबर<br><br>मराठा चेंबर<br><br>मराठा चेंबर<br><br>मराठा चेंबर<br><br>मराठा चेंबर | मऔविमं<br><br>मऔविमं<br><br>मऔविमं<br><br>मऔविमं<br><br>मऔविमं | क्षेत्र व्यवस्थापक, मऔविमं यांनी स्पष्ट केले की,सदरचे कार्यालय अहमदनगर येथेच आहे. सध्या अधिकारी दीर्ध रजेवर आहेत म्हणुन प्र्भारी अधिकारी काम पहातात.<br><br>औद्यो. संघटनांनी भूखंडा बाबत तक्रार केली असता एकुण भुखंड किती होते, त्यांचे वाटप किती व कोणाला दिले तसेच वर्ग झाले वगैरे बाबत तपशिलवार माहिती मंडळाचे अधिकारींनी माहिती मा. अध्यक्षांनी सादर करुन त्याची प्र्त जिउकेंस. पुरवावी अशा सूचना केल्या. (**कार्यवाही : क्षेत्रव्यवस्थापक, मऔविमं**).<br><br>यावर चचे अंती मा. अध्यक्षांनी सदरची बाब गंभीर असल्याने असे होऊ नये म्हणुन क्षेत्र व्यवस्थापक मऔविमं यांनी पोलीसांकडे तक्रार नोंदवावी व किती झाडे तोडली याचा अहवाल मा. अध्यक्षांनी सादर करुन त्याची प्रत जिउकेंस पुरवावी. (**कार्यः क्षेत्रव्यवस्थापक,मऔविमं**)<br><br>जिउके. यांनी सबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर रचनाकार, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांची मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली छोटी बैठक आयोजित करावी. ( **कार्यवाही : जिउकें**)<br><br>क्षेत्र व्यवस्थापक मऔविमं व पोलीस यांनी परवानगी नसलेले फलक दोन दिवसात काढावेत व अहवाल सादर करावा. ( **कार्यवाही : क्षेत्र व्यवस्थापक मऔविमं व पोलीस**) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आहे. | | | |
| | ६. उर्जा मित्र मिटींग सध्या होत नाही. मराविमं यांनी दोन महिन्यातुन एकदा सभा घ्यावी. | मराठा चेंबर | मराविमं | तसेच उर्जा समितीच्या बैठकांचे इतिवृत्त पाठविण्याची विनंती केली होती. अद्याप उत्तर अप्राप्त आहे. यांवर मा. अध्यक्षांनी मराविमंच्या उपस्थित अधिका-यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी यापुढे नियमित बैठका आयोजित करण्याचे आश्वासन दिले. **(कार्यवाही : मराविमं)** |
| | ७. रिक्षा थांब्यासाठीच्या जागेवर नेहमी ट्रक उभे असतात. कार्यवाही व्हावी | मराठा चेंबर | मऔविमं | मऔविमं यांनी पोलीसांच्या मदतीने कार्यवाही करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या (**(कार्यवाही : मऔविमं)**) |
| | ८. निंबळक रोड अतिशय खराब झाला असून मऔविमं तील एल ब्लॉक मधील कारखान्यातील कामगारांना जाणे-येण्यासाठी त्रास होत आहे. दुरुस्ती व्हावी. | मराठा चेंबर | मऔविमं | मऔविमं यांनी त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या (**(कार्यवाही : मऔविमं)**) |
| | ९. नगर मनमाड रस्त्याचे जागतिक बँक प्रकल्पाच्या माध्यमातून रस्त्याचे चौपदरी करणाचे काम सुरु आहे. मात्र सिना नदीवरील पुलाचे काम २ वर्षापासून मंद गतीने सुरु आहे. पुलावर ट्रॉफीक जाम होते. ट्रकच्या मोठया मोठया रांगा लागतात, अपघात होतात, पुलाचे काम क्ष्वरीत काम पुर्ण व्हावे. | मराठा चेंबर | कार्य.अभि. जागतीक प्रकल्प | कार्यकारी अभियंता, जागतिक प्र्कल्प यांनी त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या (**(कार्यवाही : कार्यकारी अभियंता, जागतिक प्र्कल्प**) |
| | १०.फायर एन ओ सी. बाबत अग्नीशमन विभागाच्या जाचक अटीमुळे लघ्रु उद्योजकांना ५००० ते १०००० लि. क्षमतेची पाण्याची | मराठा चेंबर | मनपा. | ही बाब धोरणात्मक असल्याने विभागीय / राज्य स्तरीय उद्योग मित्र बैठकित चर्चा घडवुन आणण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्यात. **(कार्यवाही : जिउके.)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टाकी बांधणे आवश्यक असते. ही अट शिथील करुन पूर्वीप्रमाणेच नियम ठेवावेत.<br>११.नविन उद्योजक व व्यावसायीक यांना मऔविमं यांनी ५०० ते १००० चौ.फु. क्षेत्राचे गाळे लॅटेड बिल्डींग बांधुन वितरीत करणे बाबत. | मराठा चेंबर | मऔविमं. | मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अॅन्ड अॅगीकल्चर यांनी सविस्तर मागणी मऔविमं यांचेकडे नोंदवावी अशा सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.**(कार्यवाही : मराठा चेंबर व मऔविमं)** |
| ४ | कोपरगांव सऔव प्लॉटवरुन गेलेल्या इले. एल टी लाईन ११ के व्ही. चे रोडच्या कडेने शिफटींग करुन मिळणे बाबत.<br>कोपरगांव रेल्वे स्टेशन रोड लगतचे व गारदा नाल्यातील अतिक्रमण काढणे बाबत. | कोपरगांव सऔव<br><br><br>कोपरगांव सऔव | मराविमं<br><br><br>कोपरगांव न.पा. | लाईनमुळे भुखंडधारकांना इमारत बांधकाम करणेस अडथळा निर्माण झालेला आहे असे संस्थेने कळविले आहे. याबाबत तपासणी करुन मराविमं यांनी त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. **(कार्यवाही : मराविमं)**<br>याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधीत उपविभागीय अधिकारी व नगरपालिका यांना पत्राने कळविण्यास सूचित केले.<br>**(कार्यवाही : जिउकें.)** |
| ५ | पांढरीपुल ता. नेवासा एम आय डी सी संदर्भात | | मऔविमं. | प्रादेशिक अधिकारी, मऔविमं यांनी पत्र दि. ५-७-१० अन्वये कळविले की संपादीत क्षेत्रात एकुण १४२ भूखंड आरेखन केले. १०३ भुखंड वाटपास शिल्लक आहेत त्यांना मागणी अर्ज प्राप्त. नेवासा तालुका, नगर तालुका रा.मा.क्र.६० चे पूर्वे कडील क्षेत्राचे प्राथमिक स्वरुपात पाहणी करुन अभिलेख संकलित करण्याचे काम चालु आहे. प्रस्ताव अद्याप तयार नाही. सदरचे काम डीएमआयसी अंतर्गत औद्योगिक क्षेत्रासाठी नियोजित होते. असे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी सद्यस्थितीत भूखंडांची संपूर्ण माहिती सादर करण्याच्या सूचना मंडळास दिल्या **(कार्यवाही : मऔविमं.)** |
| ६ | १. संस्थेच्या स.नं.४८ मधील अतिक्रमण शासनाने काढुन द्यावे संस्था सर्व खर्च शासनास देण्यास तयार आहे.<br>२. पोष्ट ऑफीस व बॅंक सुविधेसाठी | संगमनेर सऔव | सऔव,/नपा/ पोलीस खाते / तहसिलदार | सहकारी औद्योगिक वसाहत यांचे प्रतिनिधी सभागृहात उपस्थित नसल्याने सविस्तर चर्चा होऊ शकली नाही. याबाबत त्यांना कळविण्यास मा. अध्यक्षांनी सूचित केले. **(कार्यवाही : जिउकें)**<br>२. जिल्हा अग्रणी बॅंकेने यावर पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | संस्था जागा उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. | | | दिल्या. **(कार्यवाही : जिल्हा अग्रणी बँक)** |
| ७ | सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम २००६ अधिसूचना | जिउकें | सर्व संबंधीत औद्यो. संघटना, सऔव व अग्रणी बँक | शासन अधिसूचना दि. ११-१२-२००९ अन्वये सुक्ष्म लघु उपक्रम सुकरता परिषद नियम २००७ मधील नियम ३ नुसार नाशिक महसूल विभागासाठी सुक्ष्म लघु उपक्रम सुकरता परिषद स्थापन केली आहे. असे सदस्य सचिवांनी सभागृहात माहिती दिली असता मा. अध्यक्षांनी सुक्ष्म लघु उपक्रमांना मध्यम व मोठया घटकांकडून होणारे शोषण व पिळवणूक यापासून संरक्षण मिळणे करीता परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे. तरी सुक्ष्म, लघु उपक्रमांना असलेल्या अडी अडचणी सुकरता समिती / जिउकें कडे मांडाव्यात.अशा सूचना दिल्या. |
| ८. | समुह विकास योजना | जिउकें | - | केंद्र शासनाच्या समुह विकास योजनेंतर्गत अहमदनगर येथे ऑटो इंजिनियरींग क्लस्टर स्थापन करण्याची कार्यवाही सुरु असून अहमदनगर ऑटो ॲन्ड इंजिनियरींग या नावाने विशेष हेतु वाहन स्थापन करण्यात आलेले आहे. विशेष हेतु वाहनाने अहमदनगर औद्योगिक क्षेत्रात भूखंड घेतलेला आहे. संचालक, सुक्ष्म लघु व मध्यम उपक्रम संस्थान, साकी नाका, मुंबई यांच्या मार्फत डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्याचे काम सुरु आहे. करीता ही बाब सर्व सदस्यांच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर केली. |

शेवटी मा.अध्यक्षांच्या अनुमतीने सदस्य सचिवांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, अहमदनगर.

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, अहमदनगर.